नि.दि.दा.क्र. १४७/२०१४
प्रशांत विरुध्द हणुमंत
नि.क्र.५३ पुढे सुरु.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील उलटतपास शपथेवर सुरु.**

**उलटतपास** प्रति**वादी तर्फे** विधीज्ञ श्री.डी.एस. शिंदे.

६. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र १२४९ च्या पूर्वेला रमेश बिरामणे व पश्चीमेला सचिन शिंदे व नितीन शिंदे यांच्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरील चतुःसिमा दि. २१.०३.१९९७ रोजीच्या दस्तात देखील नमूद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्त वादीचे वडील मंगलसिंग आणि प्रतिवादी क्र १ चे वडील रघुनाथ पोळ यांच्यात झाला होता. आता मला दस्त यादी निशाणी क्र ४ सह दाखल दस्त क्र ३ दाखवण्यात आला. सदरील दस्त म्हणजेच दि. २१.०३.१९९७ रोजीचा साठेखताचा मूळ दस्त होय. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर हणुमंत पोळ यांची सही नाही.(सदरील दस्त वादीतर्फे दाखल असून त्याबाबत प्रतिवादीचे विधीज्ञांनी साक्षीदारास प्रश्न विचारल्याने त्या **मूळ दस्तास निशाणी क्र. ६१** देण्यात येते.)

७. हे म्हणणे खरे आहे की, सदरील निशाणी क्र ६१ वरील दस्तात मिळकत क्र. १२४९ च्या पूर्वीच्या वीस गुंठे क्षेत्राचा समावेश आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०२.०५.१९९७ च्या साठेखतास माझे पती मंगलसिंग रायते यांनी संमती दिली नव्हती. आता मला सदरचा मूळ साठेखताचा मूळ दस्त दाखवण्यात आला. तो दस्त यादी निशाणी क्र ४ सह दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर मंगलसिंग रायते यांची सही नाही. (सदरील दस्त वादीतर्फे दाखल असून त्याबाबत प्रतिवादीचे विधीज्ञांनी साक्षीदारास प्रश्न विचारल्याने त्या **मूळ दस्तास निशाणी क्र. ६२** देण्यात येते.)

**प्रकरण पुढील उलटतपासाकरिता तहकूब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई.
दि.०२.०५.२०२५

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.05.08 17:11:37 +0530

(आर.एम. भेंडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.